शाळा मान्यता आदेश

नमुना - २

जा.क्रं.बुजिप/शिप्रा/खाप्राशा/ ६०९०/२०१८
जिल्हा परिषद,बुलडाणा
शिक्षण विभाग,(प्राथमिक)
दिनांक :- २२ ऑक्टोबर,२०१८.

प्रति,

व्यवस्थापक/मुख्याध्यापक,
तोमाई इंग्लिश स्कुल, जांभरुन ता. जि. बुलडाणा.

विषय :- बालकांचा मोफत सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ , बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम, २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

संदर्भ :- गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती बुलडाणा यांचे पत्र क्र १०२८/२०१८ दिनांक ०३/०७/२०१८ या कार्यालयास प्राप्त दिनांक २२/१०/२०१८.

वरिल संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती यांनी केलेल्या शिफारशीनुसार, मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, बुलडाणा दिनांक ०१/०४/२०१७ पासून ते दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता १ ली ते ८ वी करिता, **तोमाई इंग्लिश स्कुल, जांभरुन ता. जि. बुलडाणा** या शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे. सदर मान्यता ही खालील शर्ती अटींच्या अधिन राहून मान्यता देत आहे.

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणचा अधिनियम, २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्रातील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीनुसार शाळा पालन करील.
३. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतीपूर्ती मिळेल, अशी प्रतीपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
५. संस्था / शाळा कोणतीही कॅपीटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्याच्या किंवा तिच्या माता-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म, जात किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यांपैकी कोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकांस तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन) कोणत्याही बालकास शारीरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षाउत्तीर्ण होणे आवश्यकअसणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकांस, नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील , आणि

(आठ) शिक्षकाने/ शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

८. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.
९. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहीत केल्याप्रमाणे शाळेत उपलब्धअसलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
१०. शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील .

मागील तपासणीच्या वेळेस शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालील प्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ :- ३ एकर..
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ:- २०००० चौ.मी..
- वर्ग खोल्यांची संख्या- ०९
- कार्यालय -नि- भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली- आहे
- मुलांसाठी व मुलीसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहे - जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल- आहे.
- पिण्याच्या पाण्याची सुविधा- नळ
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर :- लागु नाही
- अध्यापन अध्ययन साहित्य/ खेळ क्रिडाविषयक सामग्री/ ग्रंथालय यांची उपलब्धता- आहे.
- वाचन साहित्य विनायासास उपलब्ध- आहे.

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र , चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६०(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजनीक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्या ही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालैविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षीत व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक **२७०४०१००६०२** हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक/ जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा सुचनांचे पालन करावे.

संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी

(एस.टी. वराडे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, बुलडाणा.

प्रतिलिपी,
गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बुलडाणा यांना माहिती करीता रवाना.

PRESIDENT
ABHIJAT MULTIPURPOSE SOCIETY
BULDANA. Reg. No. F - 8370

PRINCIPAL
... ENGLI... SCHOOL
BULDANA.